दिनांक १ जुलै, २०१७ रोजी राज्यात किमान ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेत सवलत देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१७ / प्र. क्र. १०६ / १८ (र. व का.)
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०१७

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : सावनि - २०१६ / प्र. क्र. ८० / फ - ११, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६.

परिपत्रक :

दिनांक १ जुलै, २०१७ ह्या एकाच दिवशी राज्यात किमान ४ कोटी वृक्ष लागवड करण्याच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे शासनाने निश्चित केले आहे. त्या दिवशी वन विभागामार्फत २.२५ कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे. तसेच शासनाच्या इतर २९ विभागांमार्फत ०.७५ कोटी आणि ग्रामपंचायतींकडून १.०० कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

२. राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय संस्था / कार्यालये यामधील अधिकारी / कर्मचारी यांनी या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

३. सदर वृक्षारोपण कार्यक्रम हा सकाळी ६ ते दुपारी १ वाजेपर्यंत सोयीच्या वेळेत व सोयीच्या ठिकाणी आयोजित करता येईल. वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यालयात उशीरा येण्यासाठी सवलत मंजूर करण्यात येत आहे.

४. वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये स्वत: वृक्षारोपण करणे, स्वयंसेवक म्हणून वृक्षारोपण कामात भाग घेणे, लोकांना वृक्षारोपणासाठी उद्युक्त करणे, शासकीय यंत्रणांना वृक्षलागवडीच्या कामात जी मदत लागेल ती स्वतः पुढाकार घेऊन देणे, लोकसहभाग मिळविणे इत्यादी कामेदेखील करणे अपेक्षित आहे. सदर कार्यक्रम पार पाडल्यानंतर संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी लगेचच आपल्या कार्यालयात कर्तव्यावर रुजू होणे आवश्यक आहे. सदर सवलतीचा लाभ जे अधिकारी / कर्मचारी वृक्षारोपण करतानाचे छायाचित्र सादर करतील त्यांनाच अनुज्ञेय राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

५. सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणाव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०६२३१७५०४२१८०७ असा आहे. तसेच डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra,
cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2017.06.23 17:48:56 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (प्र. सु. र. व का.)

---

Estd:1962
NAAC 'A' Grade

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक ०१ जुलै, २०१७ रोजी राज्यात किमान ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेत सवलत देणेबाबत शासन परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 1757
दिनांक 30 JUN 2017

प्रति,
१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, मा. प्रभारी प्र—कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
५. इंटरनेट विभाग— सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)